नि.फौ.ख.क्र. २८७/२०२२

सरकार–वि–तुळशीराम चौधरी

निशाणी क्र. २९

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर जबानी.**

नांव – लता सोमनाथ चौधरी

वय – ३५

धंदा – शेती

राहणार – खिल्लार पाडा, पारेगाव ता. चांदवड जि. नाशिक.

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. पोलीसांनी माझा वडनेर भैरव पो.स्टेशनला जबाब घेतला होता. मात्र त्याची तारीख मला सांगता येणार नाही. घटना साधारणतः ३ वर्षांपूर्वी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान आमच्या शेतामध्ये घडली होती. त्यादिवशी माझे पती शेतामध्ये नांगरणी करत होते. त्यावेळी आरोपी क्र. १ सामाईक बांधाची दगडे काढत होते. त्यावेळी त्यांना माझे पती म्हणाले की बांध आहे तसाच राहू दे दगड काढू नका, त्यावर आरोपी क्र. १ ने माझ्या पतीला फावड्याने डोक्यात मारले. त्यांना सोडविण्यासाठी मी व माझी सासु गेलो. माझ्या सासुला देखील आरोपी क्र. १ च्या हातातील फावड लागले व माझ्या हाताला देखील ते फावडे लागले. आरोपी क्र. २ ते ४ ने आम्हाला शिवीगाळ केली. आरोपी क्र. २ ते ४ यांनी माझ्या पतीला पाठीमध्ये फावड्याने मारले. त्यामुळे माझ्या पतीने नाशिकच्या सरकारी दवाखान्यात उपचार घेतले. आरोपींविरुद्ध माझ्या पतीने पो. स्टेशनला फिर्याद दिली होती. आरोपींनी ज्या फावड्याने माझ्या पतीला मारहाण केली होती ते दाखविल्यास मी ओळखू शकते. मला आता दाखविलेले आर्टीकल अ कडील फावडे तेच आहेत. मी आरोपींना ओळखते. आज न्यायालयामध्ये आरोपी क्र. १

व २ हजर आहेत. आरोपी क्र. ३ व ४ च्या गैरहजेरीचा अर्ज त्यांच्या वकीलांनी दिलेला असून तो अर्ज आरोपीची ओळख आव्हानित करणार या अटीवर मंजूर करण्यात आला.

**सरतपासपूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. एस. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यंत झाले आहे. आरोपी माझे भाऊबंद आहेत. हे म्हणणे खरे नाही की घटनेपूर्वीपासून आमचे आरोपींसोबत चांगले संबंध नाहीत. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व आमच्यामध्ये शेतीचे तोंडी वाटप झाले आहे.हे म्हणणे खरे नाही की तोंडी वाटपावरुन आमच्यामध्ये व आरोपीमध्ये नेहमीच पूर्वीपासून वाद होत होते. हे म्हणणे खरे नाही की या घटनेच्या पूर्वी आरोपींनी माझ्या सासऱ्यांविरुद्ध पो. स्टेशनला तक्रार दिली होती. माणिक चौधरी व निवृत्ती चौधरी आमच्या परिचयाचे नाहीत. माणिक चौधरी व निवृत्ती चौधरी हे माझे मोठे दीर आहेत. हे म्हणणे खरे नाही की माणिक चौधरी व निवृत्ती चौधरी यांचे आरोपींसोबत आता चांगले संबंध नाहीत. आरोपी व आमच्यामध्ये कोणत्या गट नं. मध्ये मारामारी झाली होती ते मला सांगता येणार नाही. पोलीसांनी जेव्हा माझा जबाब घेतला तेव्हा पोलीसांना मी गट नं. सांगितला होता किंवा कसे हे मला आठवत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की आमची व आरोपींची शेती सामाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की सामाईक बांधावरुन आमच्यामध्ये व आरोपीमध्ये नेहमी वाद होतात. आमच्या घराच्या आजूबाजूला कोण–कोण राहतात त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगते की तिच्या घराच्या बाजूला अशोक चौधरीचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की फावडे प्रत्येक शेतकऱ्याकडे असते. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल ए कडील फावडे पोलीसांना आम्ही दिले. आमच्या गावापासून वडनेर भैरव पो. स्टेशन किती अंतरावर आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेवेळी मी घरी होते. फिर्याद देतांना माझ्या

पतीसोबत मी व माझी सासु होतो. आज न्यायालयात साक्ष देण्यासाठी मी माझे पती, सासु सोबत आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की आज न्यायालयात काय साक्ष द्यायची हे मला माझ्या पतीने व दीरोन सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की आज न्यायालयात मी साक्ष देतांना माझे पती, माझे दीर, व सासु न्यायालयात माझ्या समोरच उभे आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी न्यायालयात साक्ष देत असतांना माझे पती बाहेरुन मला इशारे करत आहेत त्याप्रमाणे मी साक्ष देत आहे.

४. मला घटनेची तारीख लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पती फिर्याद देतांना मी त्यांच्यासोबत होते. माझ्या पतीने जी फिर्याद दिली होती ती टंकलिखित होती. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी टंकलिखित करुन ठेवलेल्या फिर्यादवर माझ्या पतीने केवळ सही केली. न्यायालयात आज साक्ष देण्यासाठी मी आज मोटारसाकलवरुन आले. हे म्हणणे खरे आहे की घराकडून गावाकडे येण्या–जाण्याचा आमचा रस्ता कच्चा आहे. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझा जो जबाब नोंदविला आहे तो पोलीसांनीच तयार केलेला होता. माझे पती किती दिवस दवाखान्यात दाखल होते हे मला सांगता येणार नाही. घटना झाल्यानंतर आधी आम्ही पो. स्टेशनला गेलो. माझ्या पतीने वडनेर भैरव येथील सरकारी दवाखान्यात आणि नाशिक येथील सरकारी दवाखान्यात उपचार घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व आमच्यातील शेतीचे वाद पूर्वीपासून ते आतापर्यंत चालू आहेत. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटना माझे पती शेतामध्ये नांगरणी करतांना घडल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्या पतीला फावड्याने मारहाण केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल ए कडील फावडे मी आता पहिल्यांदाच पाहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीने सरकारी दवाखान्यात उपचार घेतल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींसोबत शेतीवरुन आमचा वाद असल्यामुळे मी त्यांच्याविरुद्ध खोटा जबाब दिलेला आहे. आर्टीकल ए कडील फावडे कोणासमोर जप्त केले ते मला सांगता

येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी, माझी सासुबाई व माझे पती मोटारसायकलवरुन कच्चया रस्त्याने येत असतांना मोटारसायकलवरुन पडल्यामुळे आम्हाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की त्या लागलेल्या माराचा गैरफायदा घेऊन आरोपींविरुद्ध आम्ही खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिलेली आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.11 15:20:18 +0530

**दि. ११.०७.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**चांदवड.**

नि.फौ.ख.क्र. २८७/२०२२

सरकार–वि–तुळशीराम चौधरी

निशाणी क्र. ३०

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची शपथेवर जबानी.**

नांव – यशोदाबाई नामदेव चौधरी

वय – ६०

धंदा – शेती

राहणार – खिल्लार पाडा, पारेगाव ता. चांदवड जि. नाशिक.

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. पोलीसांनी माझा वडनेर भैरव पो.स्टेशनला जबाब घेतला होता. मात्र त्याची तारीख मला सांगता येणार नाही. घटना साधारणतः ३ वर्षांपूर्वी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान आमच्या शेतामध्ये घडले होते. त्यादिवशी माझा मुलगा सोमनाथ शेतामध्ये नांगरणी करत होता. त्यावेळी आरोपी क्र. १ सामाईक बांध उकरत होता व बांधाचे दगड काढत होता. त्यावेळी त्याला माझा मुलगा म्हणाला की बांध आहे तसाच राहू दे दगड काढू नका, त्यावर आरोपी क्र. १ ने माझ्या मुलाला फावड्याने डोक्यात, पाठीत मारले. त्यांना सोडविण्यासाठी मी व माझी सुन गेलो. त्यावेळी मला आरोपी क्र. १ च्या हातातील फावडे लागले व माझ्या सुनेच्या हाताला देखील ते फावडे लागले. आरोपी क्र. २ ते ४ ने आम्हाला शिवीगाळ केली. आरोपी क्र. २ ने माझ्या मुलाला पाठीमध्ये फावड्याने मारले. त्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त येत होते. त्यामुळे आम्ळी माझ्या मुलाला घेवून वडनेर भैरव पोलीस स्टेशनला गेलो. तिथे पोलीसांनी आमचे जबाब घेतले. तेथून आम्ही माझ्या मुलाच्या उपचारासाठी नाशिकच्या सरकारी दवाखान्यात गेलो. आरोपींविरुद्ध माझ्या मुलाने पो. स्टेशनला फिर्याद दिली होती. आरोपींनी ज्या

फावड्याने माझ्या मुलाला मारहाण केली होती ते दाखविल्यास मी ओळखू शकते. मला आता दाखविलेले आर्टीकल अ कडील फावडे तेच आहे. मी आरोपींना ओळखते. आज न्यायालयामध्ये आरोपी क्र. १ व २ हजर आहेत. आरोपी क्र. ३ व ४ च्या गैरहजेरीचा अर्ज त्यांच्या वकीलांनी दिलेला असून तो अर्ज आरोपीची ओळख आव्हानित करणार या अटीवर मंजूर करण्यात आला. मला आता घटनेवेळी माझ्या मुलाचा व माझा काढलेला फोटा दाखविण्यात आला. त्याला **आर्टीकल बी** व **सी** देण्यात येते. ते फोटो आरोपींनी घटनेवेळी आम्हाला मारहाण केली होती त्यावेळचे काढलेले आहेत.

**सरतपासपूर्ण**

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.11 15:20:29 +0530

**दि. ११.०७.२०२५** **(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**चांदवड.**